सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-०५२५/प्र.क्र.१५०/ विशा-३अ दि. २४ जून,२०२५.

**विषय :-** M/s Pelorus Technologies Pvt.Ltd.Mumbai पुरवठादारास माहे डिसेंबर -२०२३ ते माहे ऑगस्ट-२०२४ या कालावधीतील तीन तिमाहीमध्ये Moblie Device Forensic Tools चे सर्व समावेशक वॉरंटी व देखभालीकरीता एकूण रु.६६,९८,७००/- इतकी रक्कम अदायगी करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-०५२५/प्र.क्र.१५०/ विशा-३अ दि. २४ जून,२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०६२४१८०८५३९९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 27-06-2025 17:01:30

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (नि.व स.),महाराष्ट्र राज्य,मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, सायबर सुरक्षा,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक, (नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी का.क्र.१७

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**M/s Pelorus Technologies Pvt. Ltd. Mumbai पुरवठादारास माहे डिसेंबर-२०२३ ते माहे ऑगस्ट-२०२४ या कालावधीतील तीन तिमाहीमध्ये Mobile Device Forensic tools चे सर्वसमावेशक वॉरंटी व देखभालीकरीता एकूण रू.६६,९८,७००/- इतकी रक्कम अदायगी करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-०५२५/प्र.क्र.१५०/विशा-३अ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
तारीख: २४ जून, २०२५

**संदर्भ :-**

१) शासन निर्णय क्रमांक: गृह विभाग क्रमांक संकिर्ण-२०१७/प्र.क्र.७५/विशा-३अ /भाग-दि.२५.०१.२०२३
२) शासन निर्णय क्रमांक: गृह विभाग क्रमांक संकिर्ण-२०१७/प्र.क्र.७५/विशा-३अ /भाग- दि.२७.०३.२०२३
३) शासन निर्णय क्रमांक गृह विभाग क्रमांक संकिर्ण-२०१७/प्र.क्र.७५(भाग-१) /विशा-३अ /भाग- दि.२८.११.२०२३
४) शासन निर्णय क्रमांक गृह विभाग क्रमांक संकिर्ण-२०२४/प्र.क्र.५३/विशा-३अ /भाग- दि.१८.०३.२०२४
५) शासन निर्णय क्रमांक गृह विभाग क्रमांक संकिर्ण-०३२४/प्र.क्र.५३/विशा-३अ /भाग- दि.२२.०१.२०२५
६) अपर पोलीस महासंचालक (नि.व स.)यांचे पत्र क्र.पोमसं /१७-अ/६१६२/Mobile Device Forensic Tools / ६८/ २०२१, दि.२७.०३.२०२५ व १६.०५.२०२५

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पांतर्गत सायबर पोलीस ठाण्यांसाठी ८० नग UFED Licenses च्या नुतनीकरणास व २ UFED नवीन नग M/s Pelorus Technologies Pvt. Ltd, Mumbai या कंपनीकडून रु. १७,८६,३२,०००/- इतक्या दरास खरेदी करण्यास संदर्भाधीन क्र. १ अन्वये मान्यता देण्यात आली होती. त्यानुषंगाने ८० नग Mobile Device Forensic Tool चे नुतनीकरण आणि २ नगांचा नव्याने पूरवठा केला असल्यामुळे एकूण मान्यता दिलेल्या रक्कमेच्या ७०% रक्कम रू.१२,५०,४२,४००/- इतकी संदर्भाधीन क्र. २ अन्वये अदा करण्यात आली आहे.

२. ८० नग UFED चे नुतनीकरण व २ नवीन UFED नगाची सर्वसमावेशक वॉरंटी व देखभाल या करिता प्रथम वर्षातील माहे मार्च-२०२३ ते नोव्हेंबर-२०२३ या प्रथम, द्वितीय व तृतीय तिमाहीच्या कालावधीतील प्रती

तिमाही रू.२२,३२,९००/- प्रमाणे एकूण रू. ६६,९८,७००/- इतकी रक्कम अनुक्रमे उपरोक्त संदर्भ क्र.३,४ व ५ अन्वये अदा करण्यात आली आहे.

आता उपरोक्त संदर्भाधीन पत्र क्र.६ अन्वये अपर पोलीस महासंचालक (नि.व स.) यांनी M/s Pelorus Technologies Private Limited, Mumbai यांना निविदेमध्ये नमूद केल्यानुसार सर्वसमावेशक वॉरंटी व देखभाल या करिता डिसेंबर-२०२३ ते माहे ऑगस्ट-२०२४ या तीन तिमाहीची रक्कम अदा करण्याबाबात प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्याअनुषंगाने सदर रक्कम M/s Pelorus Technologies Private Limited, Mumbai यांना अदा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सायबर सुरक्षा प्रकल्पांतर्गत M/s Pelorus Technologies Pvt. Ltd, Mumbai यांना बिडमधील Scope of Work मधील तरतुदीनुसार ८० नग Mobile Device Forensic Tools चे नुतनीकरण तसेच नव्याने घेतलेल्या २ नगाची **१) माहे डिसेंबर-२०२३ ते फेब्रुवारी-२०२४ या प्रथम वर्षातील चतुर्थ तिमाही, २) माहे मार्च-२०२४ ते मे-२०२४ या व्दितीय वर्षातील प्रथम तिमाही व ३) माहे जून-२०२४ ते ऑगस्ट-२०२४ या व्दितीय वर्षातील व्दितीय तिमाही** या तिमाही कालावधीमध्ये सर्वसमावेशक वॉरंटी व देखभाल समाधानकारक केल्यामुळे रु. १७,८६,३२,०००/- (अक्षरी रू. सतरा कोटी शहाऐंशी लाख बत्तीस हजार फक्त) या एकूण खरेदी किंमतीच्या प्रती तिमाही १.२५% नुसार रु.२२,३२,९००/- (अक्षरी बावीस लाख बत्तीस हजार नऊशे फक्त) इतकी रक्कम या प्रमाणे सदर तीन तिमाही करीता **रू.६६,९८,७००/- (अक्षरी रू. सहासष्ट लक्ष अठ्ठ्यान्नव हजार सातशे फक्त) इतकी रक्कम** M/s Pelorus Technologies Pvt. Ltd, Mumbai यांना अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खर्च "मागणी क्र. बी-१, २०५५- पोलीस (००) ११५, पोलीस दलाचे आधुनिकीकरण (०१) तंत्रज्ञान विकास प्रकल्प (०१) (०१) तंत्रज्ञान विकास प्रकल्प,(५२)- यंत्रसामग्री व साधनसामग्री (२०५५ ए ०३२) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून तो सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल.

३. सदर निधी आहारित करण्यासाठी विशेष पोलीस महानिरीक्षक(प्रशासन), महाराष्ट्र राज्य,मुंबई हे “नियंत्रण अधिकारी” तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यालय अधिक्षक, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई हे “आहरण व संवितरण अधिकारी” असतील.

४. उपरोक्त निधी खर्च करतांना वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५ नमूद करण्यात आलेल्या परिच्छेद ५ ते १९ मधील मार्गदर्शक सूचना व परिशिष्टामधील

मार्गदर्शक सूचनाचे काटेकोर पालन करावे व वेळोवेळी विहीत विवरणपत्रात उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

५. सदर शासन निर्णय नियोजन विभाग/का-१४६१, अनौपचारीक संदर्भ क्र.२०२/२०२५ दि.२९.०५.२०२५ व वित्त विभाग/ व्यय-७ च्या अनौपचारीक संदर्भ क्र.३८९/२०२५ दि.३०.०६.२०२५ मान्यतेने अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०६२४१८०८५३९९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNA NILESH DESHPANDE

Digitally signed by SWAPNA NILESH DESHPANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=8f33d110713d529fd14cadb7107a7a56252382926dfbbe68e0ce49aae150e1e8, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F68C2CBBE864D14D120F29960E8E60D5C00E2D614E6A0234A132D68EADBD05CC, cn=SWAPNA NILESH DESHPANDE
Date: 2025.06.24 18:10:35 +05'30'

**(स्वप्ना देशपांडे)**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य ,मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य मुंबई.
३. अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य सायबर,मुंबई.
४. सह/उप सचिव (कार्यासन पोल-४ /बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा),मुंबई /नागपूर.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
८. निवडनस्ती /विशा-३अ